# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक १८७ वा गुरूवार दि.०९ जानेवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# अपघातांतील जखमींवर आता कॅशलेस ट्रिटमेंट दीड लाखापर्यंत मदत, केंद्रीयमंत्री गडकरींची घोषणा

नवी दिल्ली : वृत्तसंस्था-केंद्र सरकारने रस्ते अपघातात जखमी झालेल्यांसाठी कॅशलेस ट्रिटमेंट योजना जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत अपघातात जखमी झालेल्यांना उपचारासाठी दीड लाख रुपये दिले जाणार आहेत किंवा जखमींचा ७ दिवसांच्या उपचाराचा खर्च आता केंद्र सरकार उचलणार आहे, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.



दिल्लीतील भारत मंडपममध्ये सर्व राज्यांच्या परिवहन मंत्र्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत बोलताना त्यांनी या योजनेची घोषणा केली. यासंदर्भात राज्य आणि केंद्र सरकारमध्ये सहकार्य वाढविणे गरजेचे आहे, असेही गडकरी म्हणाले. ही योजना लागू करण्याची जबाबदारी राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण (एनएचए) यांच्याकडे असेल. मार्च २०२५ पासून ही योजना देशभरात लागू केली जाणार आहे. दरम्यान, संसदेच्या आगामी अधिवेश्नात मोटार वाहन सुधारणा विधेयक मांडले जाणार आहे, असे गडकरी यांनी सांगितले.

आम्ही अपघातात जखमी झालेल्यांसाठी कॅशलेस ट्रिटमेंट योजना सुरू केली आहे. त्यानुसार महामार्गावर अपघात झाल्यानंतर रुग्णालयात दाखल झालेल्या प्रवाशांना उपचारासाठी दीड लाख रुपयांची आर्थिक मदत केली जाणआर आहे किंवा त्यांच्या ७ दिवसांच्या उपचाराचा खर्च केंद्र सरकार करणार आहे. मात्र, त्यासाठी २४ तासांच्या आत पोलिसांना अपघाताची माहिती देणे गरजेचे आहे, असेही गडकरी म्हणाले.

**प्रायोगिक तत्त्वावर सुरू केली होती योजना**

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि राज्यमार्ग मंत्रालयाने १४ मार्च २०२४ रोजी रस्ते अपघातातील पीडितांना कॅशलेस उपचार प्रदान करण्याची पायलट योजना सुरू केली होती. ही योजना ६ राज्यांत लागू करण्यात आली होती. हा प्रयोग यशस्वी ठरला आहे. त्यामुळे आता आगामी मार्चपासून ही योजना देशभरात लागू केली जाणार आहे, असे गडकरी यांनी सांगितले.हिट अ‍ॅण्ड रनमधील मृतांना २ लाखांची मदतएकीकडे अपघातात जखमी व्यक्तीला रुग्णालयात उपचारासाठी दीड लाख रुपयांच्या मदतीची घोषणा करतानाच हिट अ‍ॅण्ड रन प्रकरणात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना २ लाखांची मदत केली जाणार असल्याचेही गडकरी यांनी जाहीर केले. अपघातग्रस्तांना किंवा त्यांच्या कुटुंबीयांना संकट काळात केंद्राची मदत मिळणार असल्याने रुग्णांना किंवा त्यांच्या नातेवाईकांना दिलासा मिळणार आहे. गडकरी यांच्या या घोषणेचे कौतुक होत आहे.

**गतवर्षी अपघातात १ लाख ८० हजार लोकांचा मृत्यू**

२०२४ मध्ये रस्ते अपघातात देशात १ लाख ८० हजार लोकांचा मृत्यू झाला. यातील ३० हजार मृत्यू हेल्मेट न घातल्याने झाले आहेत तर ६६ टक्के मृत्यू १८ ते ३४ वयोगटातील आहेत, असेही गडकरी यांनी सांगितले. यासोबतच शाळा किंवा महाविद्यालयासमोर वाहतूक नियोजन नसल्याने दरवर्षी जवळपास १० हजार विद्यार्थ्यांचा मृत्यू होतो, असेही ते म्हणाले.






# संजय पाटील यांना उत्कृष्ट वार्ता गटातून पुरस्कार जाहीर

चाकुर - उदगीर तालुका पत्रकार संघाच्या वतीने आयोजित मराठवाडा स्तरीय सन २०२३-२०२४ चे पत्रकारिता पुरस्कारजाहीर झाला असूनउत्कृष्ट वार्ता गटातूनचाकूर येथील पत्रकार संजय पाटील यांना प्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे. उदगीर तालुका पत्रकार संघाच्या वतीने गत १५ वर्षापासून मराठवाडास्तरीय उत्कृष्ठ वार्ता, शोध वार्ता या दोन गटात पुरस्कार वितरणाचे आयोजन केले जाते. पुरस्कार वितरणाचे हे १६ वे वर्ष आहे. यावर्षी जाहीर झालेल्या पुरस्कारातउत्कृष्ट वार्ता गटातून प्रथम पुरस्कारचाकूर येथील पत्रकार संजय पाटील यांच्या आईच्या प्रेमापोटी तीन मुलांनी बांधले मंदिर या बातमीस अर्जुन मूद्दा यांच्यावतीनेजेष्ठ पत्रकार कै.महादप्पा मुद्दा यांच्या स्मरणार्थ रोख पाच हजार रुपये देऊन गौरवण्यात येनार आहे.पुरस्कार वितरण सोहळा लवकरच मान्यवरांच्या हस्ते होणार असल्याचे उदगीर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष राम मोतीपवळे, कार्याध्यक्ष ड.एल. पी.उगीले,स्पर्धा सयोंजक प्रा.प्रविण जाहुरे,व्यंकट नेत्रगावकर यांनी कळविले आहे.



# प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची दहेलीतांडा येथे सांत्वनपर भेट, राष्ट्रवादी काँग्रेसच्या जडणघडणीत प्रदीप नाईक यांचे मोलाचे योगदान

किनवट/शेख शौकत :-राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी ६ जानेवारी रोजी किनवट तालुक्यातील दहेलीतांडा येथे जाऊन दिवंगत माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या कुटुंबीयांची सांत्वन पर भेट घेतली असून राष्ट्रवादी काँग्रेसच्या जडणघडणीत प्रदीप नाईक यांचे मोलाचे योगदान राहिले आहे त्यांच्या कार्याची आणि सर्वसमावेशक नेतृत्वाची पक्षाकडे कायम नोंद राहील अशा भावना प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी यावेळी व्यक्त केल्या आहेत. किनवट माहूर विधानसभेचे लोकप्रिय माजी आमदार प्रदीप नाईक यांचे १ जानेवारी २०२५ रोजी पहाटे हैदराबाद येथे हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले त्यांच्या निधनामुळे किनवट माहूर विधानसभा मतदारसंघावर शोककळा पसरली असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी ६ जानेवारी रोजी दिवंगत माजी आ. प्रदीप नाईक यांच्या दहेलीतांडा या गावी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी त्यांनी कै. प्रदीप नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून श्रद्धांजली वाहिली तसेच बेबीताई प्रदीप नाईक, चिरंजीव कपिल नाईक यांची आस्थेवाईकपणे विचारपूस करून त्यांना धीर दिला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जडणघडणीत प्रदीप नाईक यांचे मोलाचे योगदान राहिले आहे पक्षनिष्ठ आणि धर्मनिरपेक्ष राजकारण हे त्यांच्या नेतृत्वाचे विशेष गुण होते. त्यांच्या समावेशक नेतृत्वाची आणि कार्याची पक्षाच्या इतिहासात नोंद राहील अशा भावना जयंत पाटील यांनी व्यक्त केल्या असून तुम्ही खचून जाऊ नका पक्षाची धुरा आता तुम्हाला सांभाळायची आहे असे म्हणत बेबीताई प्रदीप नाईक यांना धीर दिला. याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या समवेत राकाँचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील यांच्यासह नाईक कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.



# प्रादेशिक परिवहन कार्यालयातील भ्रष्टाचार आणि दादागिरी विरोधात वाहतूकदार संघटनांची गांधीगिरी




लातूर / प्रतिनिधी :- लातूरच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, दलाल यांच्यामार्फत होत असलेल्या आर्थिक लूट आणि अधिकाऱ्यांच्या दादागिरी विरोधात जिल्ह्यातील सर्व वाहतूकदार संघटनांनी एकत्र येत कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण आंदोलन केले. मी वाहतूकदार अशा टोप्या घातलेल्या आंदोलकांनी गांधीगिरी करीत शासनाचे लक्ष वेधले.

प्रादेशिक परिवहन कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य जनतेची तेथील अधिकारी, कर्मचारी आणि दलालांकडून प्रचंड आर्थिक लूट होत असून जाब विचारण्यासाठी गेलेल्या वाहतूकदारांना अधिकारी गुन्हा दाखल करण्याची धमकी देत असल्याचा गंभीर आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. अशा भ्रष्ट आणि दादागिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी तसेच परिवहन कार्यालयात दलालांचा बंदोबस्त करावा या प्रमुख मागण्यांसाठी हे एक दिवसीय लाक्षणिक उपोषण आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात लातूर जिल्हा ट्रॅव्हल्स असोसिएशन, जिल्हा युवा मोटार मालक संघ, लोकनायक मोटार चालक मालक संघ, जिल्हा विद्यार्थी वाहतूक संघटना, टायगर ऑटोरिक्षा संघटना, आझाद मोटार चालक मालक मेकॅनिक संघ, प्रहार जनशक्ती पक्ष, भाजमुयो, कामगार मोर्चा आदी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी सहभाग नोंदविला. येत्या २० जानेवारी २०२५ पर्यंत या उपोषणाची दखल घेत शासनाने भ्रष्ट, लाचखोर आणि दादागिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई नाही केल्यास मुंबई येथील परिवहन आयुक्त कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचे आंदोलक जुगलकिशोर तोष्णीवाल, संदीप जाधव, उत्तम लोंढे, विश्वास कुलकर्णी, जाकेर सय्यद यांनी सांगितले आहे.

# विष्णू चाटे आणि जयराम चाटे यांची केज पोलीस ठाण्यात चौकशी

केज/प्रतिनिधी -केज संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणाशी ज्या खंडणी प्रकरणाचा सबंध जोडला जात आहे; त्या खंडणी आणि हत्या या दोन्ही प्रकरणातील सीआयडीच्या ताब्यात असलेला आरोपी अनुक्रमे विष्णू चाटे आणि जयराम चाटे याला तपासासाठी केज पोलीस ठाण्यात आणून चौकशी केली. या बाबतची माहिती अशी की, मस्साजोग ता केज येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या दि. ९ डिसेंबर रोजी अपहरण करून झालेल्या हत्या करण्यात आली होती. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्ये नंतर विष्णू चाटे हा देखील फरार झाला होता. त्या नंतर तब्बल दहा दिवसांनी म्हणजे १९ डिसेंबर रोजी विष्णू चाटे याला पोलिसांनी बीड येथून ताब्यात घेतले होते; खंडणी प्रकरणी विष्णू चाटे याला १० जानेवारी पर्यंत याची वाढीव सीआयडी कोठडी सुनावण्यात आली आहे. तर जयराम चाटे आणि महेश केदार या दोघांना तांबवा येथून ताब्यात घेतले होते. जयराम चाटे याची १८ जानेवारी पर्यंत सीआयडी कोठडी आहे. विष्णू चाटे आणि जयराम चाटे हे दोघेही अनुकुमे खंडणी आणि हत्या या दोन प्रकरणात सध्या सीआयडी कोठडीत आहेत. विष्णू चाटे गुन्ह्यात वापरलेला मोबाईल हस्तगत करण्यासाठी आणि जयराम चाटे यांच्याकडून विविध माहिती व पुराव्यासाठी दि. ८ जानेवारी रोजी दुपारी १२:०० वाज च्या सुमारास सीआयडीच्या पथकाने केज पोलीस ठाण्यात आणून त्यांची सुमारे चार तासापेक्षा जास्त वेळ कसून चौकशी केली आहे.




**गुन्ह्यातील तिन्ही गाड्या केज पोलीस ठाण्यात :-** संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करण्यात आलेली काळ्या रंगाची स्कॉर्पिओ गाडी क्र. एम एच-४४/झेड-९३३३) तसेच वाल्मीक कराड याला सीआयडीच्या कार्यालयात घेवून जाण्यासाठी वापरलेली शिवलिंग मोराळे यांची पांढऱ्या रंगाची स्कॉर्पिओ क्र. (एम एच-२३/ बी जी-२२३१) आणि विष्णू चाटे याची पांढऱ्या रंगाची फोर्ड अशा तिन्ही गाड्या केज पोलीस ठाण्याच्या आवारात ठेवण्यात आलेल्या आहेत.

**राष्ट्रवादी कार्यालयाची झाडाझडती :-** दिनांक ८ जानेवारी रोजी सायंकाळी ४:३० वा. च्या सुमारास केज येथील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या संपर्क कार्यालयात घेवून जात तपास केला. तर याच राष्ट्रवादी कार्यालयावर केज बंदच्या काळात दगडफेक झाली होती.

**डॉ. संभाजी वायबसे आणि ड सुरेखा वायबसे यांची पुन्हा चौकशी :-** संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना आर्थिक रसद ज्यांनी पुरविली. अशी माहिती आहे ते डॉ. संभाजी वायबसे आणि त्यांची पत्नी अधिक चौकशी केली आहे


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# घाबरूनका

संपूर्ण जगाला हादरवून सोडणार्या कोविड-१९ महामारीचे दुष्परिणाम जग अजूनही अनुभवत आहे. भारतासह इतर अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेतील वाढीचा दर कमी करून या विषाणूने जागतिक अर्थव्यवस्थेवर आघात केला. जग त्यातून बाहेर पडत असताना मेटापन्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही) सारख्या व्हायरसचा नवा धोका संपूर्ण जगात पसरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

एचएमपीव्ही विषाणू काय आहे?

अमेरिका सरकारच्या सेंटर फॉर डीसिज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन (सीडीसी) नुसार २००१ मध्ये याचा संसर्ग मानवाला होऊ शकतो, याची माहिती मिळाली होती. या विषाणूचा संसर्ग सर्वच वयोगटातील लोकांना होऊ शकतो. यामुळे रुग्णाला ताप, खोकला, नाक चोंदणे, घास घ्यायला त्रास होणे याचा सामना करावा लागू शकतो. याचा संसर्ग वाढला तर या विषाणूमुळे ब्रोन्काइटिस किंवा न्यूमोनिया देखील होऊ शकतो. या विषाणूचा इन्क्यूबेशन पीरियड साधारणपणे तीन ते सहा महिने असतो. पण आजारपणाचा काळ कमी जास्त असू शकतो. संसर्ग किती गंभीर आहे, यावर ते अवलंबून असते.

एचएमपीव्ही कसा पसरतो?

खोकताना किंवा शिंकताना बाहेर पडणार्या तुषारांतील कणांद्वारे या विषाणूचा प्रसार होतो आणि इतरांना संसर्ग होतो. हाथ मिळवणे, गळा भेट घेणे किंवा एकमेकांना स्पर्श केल्यानेही हा विषाणू पसरू शकतो. खोकला किंवा शिंकल्याने एखाद्या भागावर तुषार पडले असतील आणि त्याठिकाणी स्पर्श केलेला हात आपण चेहरा, नाक, डोळे किंवा तोंडाला स्पर्श केला तरीही संसर्ग होऊ शकतो.

जगातली आजवरची स्थिती

चीनमध्ये डिसेंबर महिन्याच्या तिसर्या आठवड्यात श्वसनाशी संबंधित आजाराच्या रुग्णांमध्ये मोठी वाढ झाल्याचे पाहायला मिळाले. एका रिपोर्टनुसार, रुग्णांत रायनोव्हायरस आणि ह्युमन मेटान्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही)च्या संसर्गाची अधिक प्रकरणे आहेत. भारतात या संसर्गाची बाधा झालेले ३ रुग्ण आढळून आले आहेत. संसर्ग होणार्यांमध्ये १४ वर्षांखालील मुलांची संख्या सर्वाधिक आहे.

इंडोनेशियाच्या आरोग्य मंत्रालयाने काही दिवसांपूर्वी एक निवेदन जारी केले आहे. त्यात चीनमध्ये इन्फ्लुएन्झा ए आणि श्वसनाच्या आजाराशी संबंधित विषाणूंबाबत चिंता व्यक्त करण्यात आली होती. हाँगकाँगच्या फ्री प्रेसने काही दिवसांपूर्वी एका रिपोर्टमध्ये हाँगकाँगमध्ये एचएमपीव्ही संसर्गाची काही प्रकरणे समोर आल्याचे सांगितले. पण त्याचा आकडा कमी आहे.

एचएमपीव्हीचा भारतात शिरकाव

चीनमधील एचएमपीव्हीच्या संसर्गाची वाढती प्रकरणे पाहता भारतातही याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. भारतीय आरोग्य सेवांचे महासंचालक डॉ. अतुल गोयल यांनी मात्र चिंतेचे कारण नसल्याचे स्पष्ट केले असले, तरीही कर्नाटकमध्ये दोन तर गुजरातमध्ये या संसर्गाची बाधा झालेले रुग्ण आढळून आले आहेत. त्यातील दोन रुग्ण हे १४ वर्षांखालील आहेत ही विशेष चिंतेची बाब आहे.

वैद्यकीय तज्ज्ञांची मते

हा एखाद्या सामान्य विषाणूसारखा असून तो श्वसननलिकेला संसर्ग करतो. त्यामुळे सर्दीसारखे आजार होऊ शकतात. एका वर्षापेक्षा कमी वयाची मुले आणि ज्येष्ठांमध्ये याच्या संसर्गामुळे फ्लूसारखी लक्षणं पाहायला मिळू शकतात. त्यामुळे कोणताही गंभीर परिणाम होत नसल्याने फारशी चिंतेची बाब नाही. हिवाळ्याच्या काळात तसेही सर्दीच्या प्रकरणांमध्ये वाढ झालेली पाहायला मिळते. आपली आरोग्य यंत्रणा या स्थितीचा सामना करण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे.

दिल्लीच्या सर गंगाराम रुग्णालयातील बाल रुग्ण विभागाचे डॉ. सुरेश गुप्ता यांनी हा काही नवा विषाणू नसल्याचं सांगितलं आहे. त्यांच्या मते, याबाबत वीस वर्षांपासून माहिती उपलब्ध आहे. हिवाळ्याच्या काळात याच्या संसर्गाची प्रकरणं समोर येतात. हा फ्लूसारखा विषाणू आहे.

यासाठीही सामान्य सर्दीला दिली जाणारी औषधंच दिली जातात. तसेच आजारी व्यक्तीला आरामाचा सल्ला दिला जातो. बहुतांश प्रकरणांत रुग्णालयात दाखल करण्याचा सल्लाही दिला जात नसल्याचेही त्यांनी सांगितले. सध्या भारतात या विषाणूचा जो प्रकार आहे त्यामुळे फार गंभीर संसर्ग होत नाही. ज्याप्रकारे कोविडचा विषाणू गंभीर रूप धारण करत होता, तसे प्रकार अजून पाहायला मिळाले नाहीत. चीनमधील या विषाणूचा स्ट्रेन किती घातक आहे तेही काही दिवसांत समजेल.

प्रतिबंध म्हणून काळजी घ्यावी

भारतीय आरोग्य सेवांचे महासंचालक डॉ. अतुल गोयल यांच्या मते, एचएमपीव्ही विषाणूचा संसर्ग असलेली व्यक्ती किंवा एखाद्याला सर्दी असेल तर त्याच्यापासून दूर राहा. खोकताना-शिंकताना तोंडावर रुमाल किंवा कापड ठेवा. त्यासाठी वेगळा रुमाल किंवा टॉवेल वापरा. काही तासांनी ते साबणाने स्वच्छ धुवा. सर्दी-खोकला असेल तर मास्क परिधान करा आणि घरीच आराम करा. अशा प्रकारे तुम्ही काळजी घेऊन या विषाणूला पसरण्यापासून लांब ठेवू शकता.

# बौद्ध धम्म ध्वज दिन : एक जागतिक उत्सव




८ जानेवारी हा 'विश्व बौद्ध धम्म ध्वज दिन' म्हणून जगभरात साजरा केला जातो. बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसारासाठी संपूर्ण जगातील बौद्धांचे एकच प्रतिक असावे. १८८५ मध्ये श्रीलंकेतील कोलंबो येथे सर्वात प्रथम बौद्ध धम्म ध्वज फडकविण्यात आला. हा दिन ध्वज श्रद्धा आणि शांततेचे प्रतिक म्हणून जगभरात स्वीकारला गेला. धम्म ध्वजाच्या रचनेबाबत अनेक मतांतरे दिसून येतात. अमेरिकेतील निवृत्त आर्मी कर्नल हेनरी स्टील वॉल्कॉट आणि जे. आर. डिसिल्वा यांनी श्रीलंकेमध्ये १८८० च्या मे महिन्यात धम्म ध्वजाची संकल्पना आणि संरचना मांडली असे मानले जाते. वॉल्कॉट यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन धम्म चळवळ आणि बौद्ध शिक्षण पद्धतीचे मूलभूत कार्य सुरू केले होते. श्रीलंकेमध्ये त्यांनी बौद्ध धम्माचे शिक्षण देणाऱ्या ४०० शाळा आणि महाविद्यालयांची निर्मिती केली, त्यापैकी आनंदा, नालंदा, महिंदा आणि धर्मराजा ह्या शिक्षणसंस्था मूलभूत मानल्या जातात.

त्यानंतर १८८४ मध्ये बौद्धांनी ब्रिटिश शासकांकडून वैशाख/वेसक पौर्णिमा दिन हा बुद्ध जयंतीचा दिवस मे १८८५ पासून सार्वजनिक सुट्टी म्हणून साजरा करण्यास परवाना मिळवला. याचवेळी बौद्धांनी 'कोलंबो समितीची' स्थापना केली. या समितीचे प्रमुख वॉल्कॉट, लिटी आणि संघा हे होते. या समितीने २८ मे १८८५ रोजीच्या वैशाख पौर्णिमे रोजी धम्म ध्वज फडकवून पहिल्यांदा सार्वजनिक सुट्टी जाहीररित्या साजरी केली. दहा सदस्यीय कोलंबो समितीने हा ध्वज १७ एप्रिल १८८५ रोजी धम्मध्वज म्हणून समस्त जनतेसमोर आणला.

१८८६ पासून वॉल्कॉट यांनी ध्वजामध्ये केलेल्या सुधारणेनुसार श्रीलंकेतील सर्व शाळा-महाविद्यालयांमध्ये आणि इतर बौद्ध राष्ट्रांमध्ये राष्ट्रीय ध्वज म्हणून फडकविण्याचे आवाहन केले. नंतरच्या काळात प्रा. जी. पी. मालालाशेखर यांनी परंपरेने संरचित केलेल्या ध्वजाचा प्रस्ताव २५ मे १९५० रोजी कँडी येथे झालेल्या 'वर्ल्ड फेडरेशन ऑफ बुद्धिस्ट' च्या बैठकीत मांडून बौद्धांचा अधिकृत ध्वज म्हणून स्वीकारण्याचे आवाहन केले. १९५२ मध्ये 'वर्ल्ड बुद्धिस्ट काँग्रेसनेही' या ध्वजाला 'आंतरराष्ट्रीय विश्व धम्म ध्वज' म्हणून मान्यता दिली आणि सुधारित ध्वज सुरू करण्यात आला व अनागरिक धर्मपाल आणि कर्नल वॉल्कॉट यांनी तो म्यानमारच्या सम्राटाकडे सुपूर्द केला.

१९५२ मध्ये जागतिक बौद्ध परिषदेने हा ध्वज आंतरराष्ट्रीय बौद्ध ध्वज म्हणून स्वीकारला. पुढे १९८५ मध्ये कोलंबो समितीने कोलंबो, श्रीलंका येथे ध्वजाची मूलत: रचना केली गेली. या समितीत पूज्य हिक्कादुवे, सुमंगल थेरा (अध्यक्ष), पूज्य मिगेत्तूवेत्ते, गुणानंद थेरो, डोनाल्ड डॉन, कारोलीस हेवावीथारणा, अंद्रीस बायर धम्मगुणवर्धना, चार्ल्स ए. डिसिल्वा, पीटर डी. अब्रेऊ, विलियम डि. अब्रेऊ, विलियम फर्नांडोसा, एन. एस. फर्नांडोसा आणि कार्लीस पूजिथा गुणवर्धना (सचिव) यांचा समावेश होता. विविध देशातील ध्वजांचे रंग, प्रकार सांप्रदायिक बौद्ध ध्वज जगातील वेगवेगळ्या भागातील विहारांमध्ये फडकतात, तथापि अनेक देशातील बौद्धांची स्वतःच्या काही विशिष्ट शिकवणीमुळे बौद्ध ध्वजातील रंगांमध्ये काही बदल करण्यात आलेला आहे. जपानी जुडो शिंशू ध्वजात केशरी रंगाऐवजी गुलाबी रंग आहे. थायलंडचा बौद्ध ध्वज पूर्णपणे मूळ बौद्ध ध्वज आहे पण त्यात धम्मचक्र समाविष्ट केले आहे. नेपाळमधील तिबेटी बौद्ध ध्वजात नारंगी रंगाऐवजी भुरकट रंग वापरण्यात आला आहे. म्यानमारमध्ये थेरवादी बौद्ध ध्वजात नारंगी रंगाच्या स्थानावर गुलाबी रंगाचा उपयोग केला गेला आहे, हा रंग देशातील समस्त भिक्खूनींच्या वस्त्राचा रंग आहे हे अधोरेखित करण्यासारखे आहे. थायलंडमध्ये थेरवादी बौद्ध लाल धम्मचक्र असणाऱ्या पिवळ्या




बौद्ध ध्वजाचा उपयोग करतात. अनेकदा आंतरराष्ट्रीय पंचशील बौद्ध ध्वजासोबत या ध्वजाची परेड केली जाते. गोशीमीकामाकु जपानी ध्वजात नारंगी रंगाऐवजी गडद निळ्या रंगाचा उपयोग झाला आहे. अशोकचक्र असलेला निळा भीम ध्वज भारतीय बौद्ध अनुयायांचा ध्वज आहे, हा ध्वज बहुतांशवेळा पंचशील ध्वजासोबतच फडकवला जातो, हा निळा बौद्ध ध्वज आंबेडकरी चळवळ आणि आंदोलनाचे प्रतीक मानले जाते. कोरियन बौद्ध पांढऱ्या बौद्ध ध्वजाचा उपयोग करतात, ज्यात लाल रंगाचे स्वस्तिक आहे. याचा अर्थ स्वस्तिक हे बौद्ध परंपरेचे प्रतीक आहे असे म्हटले पाहिजे. सोका गकाई तिरंगा बौद्ध ध्वजाचा उपयोग करतात, ज्यामध्ये निळा पिवळा आणि लाल रंग आहे.

यासाठी १८८० मध्ये श्रीलंकेचे अनागरिक देवमित्त धम्मपाल, महास्थवीर गुणानंद सुमंगल, बौद्ध विद्वान जी. आर. डिसिल्वा इत्यादींनी मिळून निळा, पिवळा, लाल, पांढरा व केशरी अशा पाच रंगाच्या उभ्या व आडव्या पट्ट्यामध्ये 'विश्व बौद्ध धम्म ध्वजाची' निर्मिती केली. कालांतराने त्याला वैश्विक मान्यता प्राप्त झाली. या ध्वजाला पाली भाषेत 'षडरोशनी ध्वज' किंवा 'धम्म ध्वज' असे म्हणतात. तसेच याला 'पंचशील ध्वज' असेही संबोधले जाते. या ध्वजाचे आंतरराष्ट्रीय परिमाण/मोजमाप आडवा ७० सें.मी.आणि उभा ५० सें.मी. असे आहे.

१) निळा (इर्श्रीश) रंग : या रंगाचा भावार्थ समानता आणि व्यापकता असा आहे. अर्थात या निळ्या आकाशाखाली सर्व प्राणी, जीवजंतू, पक्षी, व्यक्ती समान आहेत. तसेच हा रंग सार्वभौम करुणेचे प्रतिक आहे. सर्व प्राणीमात्रांप्रति कल्याणाची भावना ठेवण्याचा उपदेश हा रंग देत राहतो.
२) पिवळा (धशश्रश्रे) रंग : हा रंग तथागत बुद्धांनी दिलेला 'मध्यम मार्ग' सांगतो. मध्यम मार्गाच्या अवलंबासाठी 'अष्टांगिक मार्गावरून' चालण्याचा मार्ग तथागतांनी दिला आहे. या मार्गानेच उत्तम, चरित्रसंपन्न जीवन जगून निर्वाण प्राप्त करता येते. हाच प्रगतीचा सरळ आणि सुस्पष्ट मार्ग आहे याची शिकवण हा रंग देतो.
३) लाल (ठशव) रंग : हा रंग जीवनातील सम्यक गतिशीलता आणि दृढ निश्चयाचे प्रतिक आहे. शक्तिमान, ऊर्जावान आणि कष्टाळू बनणे, प्रत्येक व्यक्तीने धम्माचरण करणे, जनकल्याणासाठी कठोर परिश्रम करणे, धम्माच्या रक्षणासाठी वेळप्रसंगी बलिदानही पत्करण्याची शिकवण हा रंग देतो.
४) पांढरा (थहळींश) रंग : या रंगाचा भावार्थ शांती आणि पवित्रता आहे. माणूस मन आणि कर्माने शुद्ध आणि पवित्र असावा, शीलवान आणि चरित्रसंपन्न व्यक्ती बनण्यासाठी शक्य तो प्रयत्न त्याने केला पाहिजे याची शिकवण हा रंग देतो. हा रंग तथागतांच्या विचारांची पवित्रता आणि शुद्धता याचे द्योतक आहे.
५) केशरी (जीरपसश) रंग : हा रंग त्याग, सेवा यांचे प्रतीक आहे. प्रज्ञा, बुद्धिवाद आणि उच्च विद्यांची प्राप्ती करणे, प्रत्येक व्यक्तीने उच्च शिक्षण घेतले पाहिजे, ज्ञानार्जन केले पाहिजे. शिक्षण घेणे ज्ञान प्राप्त करणे हे बुद्धधम्माचे मूलभूत तत्त्व आहे. मनाला सुसंस्कृत आणि नियंत्रित करण्यासाठी ज्ञानाची, शिक्षणाची आवश्यकता असते. ज्ञान मिळविल्याने व्यक्ती प्रज्ञावंत बनू शकतो आणि तो सेवा आणि त्यागासाठी तत्पर राहतो याची शिकवण केशरी रंग देतो. हा रंग तथागत बुद्धांच्या चिवर/काशाय वस्त्राचा रंग आहे जो शक्ती आणि धाडस दर्शवितो. ध्वजातील आडव्या पट्ट्यातील पाच रंग हे विश्वातील जैविक ऐक्याचे तर उभे पाच रंग हे विश्व शांततेचे प्रतीक मानले जाते. हा ध्वज बुद्ध धम्मातील परिपूर्णतेचे प्रतिक आहे. एकूणच हा ध्वज वंश, नागरिकत्व, वर्ग, जात, रंग, नानाविध परंपरा यांमधील भेद मानत नाही.

८ जानेवारी हा 'विश्व बुद्ध धम्म ध्वज दिन' समस्त भारतीय बौद्धांचा सण, उत्सव, सोहळा व्हावा, या दिवशी बौद्धांनी निरंतरपणे एकत्र यावे आणि हा ध्वज जनमनात रूढ होऊन पुढील पिढ्यांकडे संक्रमित व्हावा, या उद्देशाने भारतातील हुपरी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर महाराष्ट्र राज्य याठिकाणी ८ जानेवारी २०१७ रोजी अनेक बुद्धिजीवीनी एकत्र येऊन 'पहिली युवा बौद्ध धम्म परिषद' आयोजित केली होती आणि याच दिवशी आग्रहाने सर्वांनी दरवर्षी एकत्र यावे, या दिवसाचे वैश्विक महत्त्व भारतातील खेड्यापाड्यात राहणाऱ्या लोकांना माहीत व्हावे म्हणून सातत्याने हा दिवस प्रकाशझोतात आणण्यासाठी या परिषदेने पुढच्याच वर्षी ८ जानेवारी २०१८ च्या निमित्ताने आयोजित द्वितीय युवा बौध्द धम्म परिषदेत 'विश्व बुद्ध धम्म ध्वज दिन' बौद्धांना मोठ्या प्रमाणात साजरा करता यावा म्हणून या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहिर व्हावी हा ठराव आणि प्रस्ताव मांडला.

या दिवशी हा धम्म ध्वज बौद्धांनी आपले घर, विहार, तक्क्या, समाज मंदिर, स्मारक,भवन, सभागृह, सांस्कृतिक इमारत, बौद्ध शाळा, शिक्षण संस्था, धम्मपरिषद किंवा सभामंच, धम्म उत्सवाचे स्थळ इत्यादी ठिकाणी सर्वात उंच असा फडकवावा. प्रत्येक बौद्ध व्यक्तीने त्याचा सन्मान आणि अभिमान बाळगावा. ८ जानेवारी हा दिवस मोठ्या उत्सवासारखा साजरा करून धम्म ध्वजास वंदन करावे असे आवाहन केले गेले. प्रतिके जपली आणि मनोमन रुजवली तर क्रांतिकारक ठरतात आणि ती नाकारली तर व्यापक क्रांतीला आपण मुकुन जाऊ हा संदेश जनमानसात जावा. सर्व बौद्ध बांधवांना आज जागतिक बौद्ध धम्म ध्वज दिनाच्या मनःपूर्वक मंगलमय शुभेच्छा !

-----------

प्रवीण बागडे
नागपूर
९९२३६२०९२९--

# मतदारांनी जागे व्हायला हवे



अतिप्रचंड बहुमत मिळालेले सत्ताधारी जनतेची जरासुद्धा तमा बाळगत नाहीत हा यापूर्वीचा अनुभव आहे. आता तोच अनुभव पुन्हा राज्यातील जनतेच्या प्रत्ययाला येत आहे. कालच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या रोखठोक शैलीला साजेसे विधान केले. मात्र त्यांनी हे विधान एका जाहीर कार्यक्रमात त्यांना निवेदन देण्याचा प्रयत्न करणार्या काही लोकांना उद्देशून जाहीर व्यासपीठावरून केले. त्यांचा हा रोख सरसकटच सर्व मतदारांना उद्देशून असावा असे त्यातून ध्वनीत झाले आहे.अजित पवार यांचे हे विधान आश्चर्यकारक आहे. ते व्यासपीठावरून आपले ताळतंत्र सोडताना पूर्वी कधी दिसले नाहीत. खूप दिवसांपूर्वी धरणातील पाण्याच्या विषयावरून त्यांनी जे आक्षेपार्ह विधान, बोलण्याच्या ओघात केले होते त्याबद्दल त्यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीपाशी जाऊन एक दिवसाचे उपोषण करून प्रायश्चित्त घेतले होते. म्हणजेच अजितदादा यांना आपल्या विधानाची चूक लक्षात आली होती आणि ती त्यांनी संवेदनशीलपणे निस्तरली होती. त्यानंतर आजतागायत ते व्यासपीठावरून संयमच बाळगताना दिसत होते.पण अलीकडे मात्र त्यांचा संयम पुन्हा ढळू लागल्याचे दिसून येत असून ते जनतेला आणि मतदारांनाही सुनवायला मागेपुढे पाहत नाहीत, असे वरील विधानावरून स्पष्ट होते. जनता ज्यांना मतदान करते आणि जे सत्ताधारी असतात त्यांच्याकडेच आपले म्हणणे मांडण्यासाठी जात असते. संबंधित मंत्री मतदारांना सहजासहजी भेटत नाहीत. त्यामुळे जिथे जिथे शक्य असेल तिथे त्यांना भेटून आपले म्हणणे किंवा गार्हाणे त्यांच्यापुढे मांडण्याचा जनतेचा प्रयत्न असतो. लोकप्रतिनिधींकडे आपली मागणी करणे म्हणजे त्या लोकप्रतिनिधीला कमी लेखण्याचा किंवा आपण त्यांचे मालक झालो आहोत असा अविर्भाव जनसामान्यांचा कधीच नसतो.पण दादांचा संयम सुटला आणि त्यांनी जागेवरच सुनावले. हा प्रकार एकीकडे झाला असतानाच दुसरीकडे महायुतीतल्या शिवसेनेच्या एका आमदाराने तर मतदारांना चक्क तवायफची उपमा दिली आहे. मतदार दोन दोन पाच पाच हजारांत विकले जातात, ते दारू मटन चिकन असल्या क्षुल्लक गोष्टींवर सुद्धा विकले जातात, त्यामुळे मतदारांची औकात एखाद्या तवायफासारखी झाली आहे, असे विधान या महाशयांनी काढले आहे. हासुद्धा निवडून आलेला आमदार आहे, तो पराभूत झालेला आमदार असला असता आणि त्याने एक वेळ असे विधान केले असते, तर कदाचित लोकांनी ते समजून घेतले असते. पण निवडून आलेल्या आमदाराने मतदारांची अशी अवहेलना करणे सर्वथा अयोग्य आहे.किंबहुना नजीकच्या भविष्यात सत्ताधारी महायुतीला अशा बेजबाबदार विधानांचा फटका बसू शकतो. पण आता प्रचंड बहुमताने पुढची किमान पाच वर्षे आपल्या ताब्यात सत्ता असल्याने या सत्ताधारी मंडळींचा एकूणच कल बेजबाबदारीने वागण्याकडे चालला आहे. जनतेला खिसगणतीत धरायचे नाही ही एक नवी रीत सध्या रूजू पाहते आहे. निवडणुका जिंकण्यासाठीचे फंडे राजकीय पक्षांच्या आता चांगले अंगवळणी पडले आहेत त्यामुळे जनतेला कसे झुकवायचे आणि त्यांना आपल्या बाजूला कसे ओढायचे यात हे राजकारणी तरबेज झाले आहेत. त्यामुळे एकदा निवडून आल्यानंतर जनतेला खिसगणतीत ठेवणे त्यांना गरजेचे वाटेनासे झाले आहे.वरील विधानांमधून सत्ताधार्यांची हीच बेफिकिरी झळकताना दिसते. बीडमध्ये सध्या जे सुरू आहे त्याचे रोज नवनवीन खुलासे समोर येत आहेत. एका तरुण सरपंचाची अमानुष हत्या झाली या प्रकरणी संबंधित मंत्री आणि आरोपींवर कारवाई व्हावी या मागणीसाठी लाखोचे मोर्चे ठिकठिकाणी निघत आहेत. बीड, परभणी पाठोपाठ पुण्यातही असाच 'जन आक्रोश' मोर्चा झाला. पण या मोर्चाची दखल घेण्याची गरज सत्ताधार्यांना वाटत नाही. मतदार किंवा जनतेला गृहीत धरण्याची प्रवृत्तीच याला कारणीभूत आहे.राजकीय पक्षांनी एकमेकांच्या विरोधात गरळ ओकणे हा समजा त्यांच्या राजकारणाचा भाग मानला तरी, राजकारण्यांनी थेट मतदारांनाच धुडकावणे किंवा त्यांचा सरसकट अवमान करणे हे मात्र कुठल्याही गणितात बसणारे नाही आणि म्हणूनच ते मान्य करता येणार नाही. अजित पवारांच्या विधानावरून आता या पुढील काळात वातावरण तापत जाईल.

# चहा पिण्याची सर्वात खराब वेळ, ९९% लोक करतात ‘ही’ चूक, शरीराचा होईल सांगाडा वाढणार नाही वजन





चहा पिण्याची सर्वात खराब वेळ, ९९% लोक करतात ‘ही’ चूक, शरीराचा होईल सांगाडा वाढणार नाही वजन

भारतीय लोक सकाळचा चहा ऊर्जा वाढवणारा मानतात, पण प्रत्यक्षात तो अनेक रोगांचे मूळ आहे. चहा पिण्याची चुकीची वेळ आणि तयारी करताना झालेली चूक हे त्यामागचे कारण आहे, काय लक्षात ठेवाल डॉक्टरांनी सांगितले.

झोपेतून उठल्यानंतर शरीराला निरोगी नाश्ता आवश्यक असतो. सोबत एक कप कडक चहा मिळाला तर आनंद होतो. काही लोकांना चहा इतका आवडतो की त्यांना सकाळी उठल्याबरोबर दुधाचा चहा त्यांना हवा असतो. भारतातील जवळपास ९९ टक्के लोक सकाळी रिकाम्या पोटी किंवा नाश्त्यासोबत चहा पितात. चहा पिण्याची ही चुकीची वेळ आहे असं जर तुम्हाला सांगितलं तर? हे नक्कीच तुमच्यासाठी खूप धक्कादायक असेल. लोक चहा बनवताना हानिकारक गोष्टी जोडतात. त्यामुळे चहाने होणारे नुकसान आणखी वाढते.

या प्रकारच्या चहामुळे कुपोषण होऊ शकते हे अनेकांना माहीत नाही. अमेरिकेत राहणारे हेमॅटोलॉजिस्ट ऑन्कोलॉजिस्ट डॉ. रवी के गुप्ता यांनी ही महत्त्वाची माहिती दिली आहे. रिकाम्या पोटी प्यायलेला चहा वृद्धांसाठीही खूप घातक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. याचा हृदयावर वाईट परिणाम होतो आणि दीर्घकाळ ॲसिडिटीचा त्रास होऊ शकतो. चला तर मग चहाऐवजी काय प्यावे, चला जाणून घेऊया.

दुधाचा चहा पिण्याने नुकसान

दुधाचा चहा पिण्याने नक्की काय नुकसान होते जाणून घ्या

चहामध्ये दूध नसेल तर मजा येत नाही आणि अनेकांना सकाळी उठल्यानंतर दुधाचा चहाच प्यायला हवा असतो. पण दुधासोबत चहा अजिबात पिऊ नये. बहुतेक लोक चहा बनवताना ही चूक करतात. असा चहा प्यायल्याने अन्नातून लोह मिळत नाही आणि निमियाचा धोका वाढू शकतो असे डॉक्टर सांगतात.

सतत चहा पिण्याची सवय आहे? मग वेळीच व्हा सावध, जाणून घ्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम

कुपोषणाचा होऊ शकतो त्रास

अवेळी चहा पिण्याने होते कुपोषण

चुकीच्या वेळी चहा प्यायल्याने कुपोषण होऊ शकते. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, तुम्ही ज्या पोषक तत्वांसह चहा पिता ते शरीरात पोहोचत नाहीत. त्यामुळे अशक्तपणा, थकवा, दम लागणे आदी समस्या उद्भवू शकतात आणि यामुळे काही लोकांना कुपोषणाच्या समस्येचा सामना करावा लागू शकतो. बरेचदा लहान मुलांना चहाची सवय लावल्यास त्यांना या समस्येला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे अशी सवय लहान मुलांना न लावणे चांगले.

ब्लोटिंग आणि सिडिटीचा त्रास

पोट फुगणे आणि पचनाचाही होतो त्रास

सकाळचा चहा शरीराचे खूप नुकसान करतो असे डॉक्टर सांगतात. रिकाम्या पोटी प्यायल्याने सिडचे उत्पादन वाढते. यामुळे पोटाला आतून नुकसान होऊ शकते आणि आम्लपित्त आणि सूज येऊ शकते. वारंवार चहा प्यायल्याने हृदयाची गती वाढते आणि बीपी अर्थात ब्लड प्रेशरदेखील वाढते जे हृदयाच्या आरोग्यासाठी वाईट आहे.

चहाऐवजी काय प्यावे

दुधाचा चहा न पिता काय प्यावे

दुधासोबत चहाऐवजी इतर पेये प्यावीत. तुळशीचा चहा, ग्रीन टी आणि कॅमोमाइल टी सारख्या हर्बल टी पचन आणि रोगप्रतिकार शक्तीसाठी उत्तम आहेत. तुम्ही मसाला चहा आणि काळ्या चहासारखा दुधाशिवाय चहा पिण्याचा पर्यायदेखील निवडू शकता. ग्रीन टी पिण्याने तुमच्या शरीराला हानी पोहचत नाही

चहा बनवताना मिक्स करा किचनमधील ५ पदार्थ, अमृतापेक्षाही लागेल चविष्ट विसराल नॉर्मल ढशर

चहा नक्की कधी प्यावा

चहा कोणत्या वेळी पिणे योग्य आहे

चहा नेहमी सकाळी उठल्यावर योग्य नाश्ता केल्यानंतरच प्यावा. त्यामुळे नाश्त्यातील पोषक तत्व सहज उपलब्ध होतात किंवा चहा पीत असताना, हेल्दी स्नॅक घ्या. रिकामा चहा पोटासाठी खूप हानिकारक आहे असेही डॉक्टरांनी आपल्या सोशल मीडिया इन्स्टाग्राम हँडलवर सांगितले आहे.

काय सांगतात डॉक्टर

टीप – हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.

# ग्रामीण भागातच रचला जातोय विकसित भारताचा पाया -विक्रमतात्या गोजमगुंडे

जळकोट/प्रतिनिधी :ग्रामीण भागात दिल्या जाणाऱ्या शिक्षणातूनच उद्याच्या विकसित भारताची पायाभरणी होत आहे. खेडोपाडी शिक्षण घेतलेले तरुण देशाच्या विकासात आज हातभार लावत असून उद्याच्या भारताचे ते मुख्य आधारस्तंभ असल्याचे प्रतिपादन लातूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विक्रमतात्या गोजमगुंडे यांनी केले.

तालुक्यातील जगळपूर बु. येथे संस्थेच्या वतीने चालवल्या जाणाऱ्या संत तुकाराम विद्यालयाच्या नूतन इमारत पायाभरणी संस्थेचे जेष्ठ सदस्य प्रा नागनाथराव कनामे यांच्या हस्ते करण्यात आला या कार्यक्रमा च्या अध्यक्ष स्थानावरून गोजमगुंडे बोलत होते. या समारंभास संस्थेचे सचिव ज्ञानोबा शेळके, वांजरवाडा केंद्रप्रमुख हंगरगे, संस्थेचे उपाध्यक्ष प्रल्हादराव दुडीले, कोषाध्यक्ष विनायकराव पिनाटे, सहसचिव विठ्ठलराव इगे,सदस्य नाथराव कोल्हे, प्रकाशराव शिंगडे, शालेय समिती अध्यक्ष हरिश्चंद्र येरमे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी मनोगत व्यक्त करताना विक्रमतात्या गोजमगुंडे म्हणाले की, शिक्षण क्षेत्राच्या माध्यमातून आपण देशासाठी योगदान देत आहोत. एक नवी पिढी घडविण्याचे काम या माध्यमातून केले जाते. या पवित्र कार्यात जे समाधान मिळते ते इतर कुठेही मिळणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी नवी सुसज्ज इमारत असावी हे माझे स्वप्न होते. त्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना अधिकाधिक सुविधा देऊन त्यांच्या गुणवत्तावाढीला हातभार लावता यावा, असे धोरण आहे. इमारतीची पायभरणी आज होत असून जूनमध्ये शाळा सुरू होत असताना विद्यार्थी नव्या इमारतीत शिक्षण घेतील, असे ते म्हणाले. भविष्यात संस्थेमध्ये मुलींच्या शिक्षणासाठी पुढाकार घेणार असल्याचेही ते हणाले.




प्रमुख पाहुणे कनामे यांनी सांगितले की, विद्यार्थी व प्राध्यापकांच्या मेहनतीमुळेच संस्था नावारूपाला येते. शिक्षकांना विद्यार्थी घडविण्यासाठी मेहनत घ्यावी लागते. यासाठी शिक्षकांनी स्वतःला अपडेट ठेवणे गरजेचे आहे. प्रत्येकाने कर्तव्यनिष्ठा बाळगली तर संस्था नावारूपाला येण्यास वेळ लागत नाही, असेही ते म्हणाले.

सचिव ज्ञानोबा शेळके यांनी इमारत उभारणीच्या माध्यमातून विद्यार्थी व ग्रामस्थ यांची स्वप्नपूर्ती होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. केंद्रप्रमुख हंगरगे यांनी शाळेच्या गुणवत्तेबद्दल समाधान व्यक्त केले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संत तुकाराम विद्यालयाचे मुख्याध्यापक यु.डी. केसाळे यांनी केले.

या कार्यक्रमास शालेय समिती सदस्य माधवराव गोलावर, शिवाजीराव मोमले, चेतन कोले, सुनील लोहकरे, मोहन लोहकरे, ईश्वर बेंबरे , मारुती लोहकरे, राहुल झोले,बालाजी केसाळे, आकाश वाघमारे, पुंडलिक वंगवाड, इब्राहिम शेख,दादामिया देशमुख, पंढरी शिळे, नामदेव लोहकरे, भानुदास बुक्के, ज्ञानोबा बुक्के, सुधाकर लोहकरे,उद्धवराव रोकडे,शिवाजी डुकरे, दीपक सावरगावे, भारत सावरगावे, प्रकाश पेद्देवाड,संभाजी पवार, विनायक पवार यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

# प्रोफेसर डॉ. नवनाथ काशीद यांचे वनस्पतीशास्त्र संशोधनातील दुसरे पेटंट

केज/प्रतिनिधी–येथील छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस, संचलित बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज , जिल्हा बीड, महाविद्यालयामधील वनस्पतीशास्त्र विभागामध्ये कार्यरत असणारे प्रोफेसर डॉ. नवनाथ काशीद यांच्या वनस्पतीअर्काचे गुणात्मक विश्लेषक यंत्र या संशोधनास युरोपीय राष्ट्रांकडून (णघ)युनायटेड किंग्डम कडून पेटंटला मान्यता देण्यात आली आहे. मानवी जीवनामध्ये वनौषधीचे खूप मोठे योगदान आहे . वैद्यकीय व आयुर्वेदिक क्षेत्रामध्ये वनस्पतीच्या अर्कापासून विविध औषधे बनवली जातात जी मानवाच्या



सर्वांगीण सुदृढ व निरोगी आयुष्यासाठी उपयोगाची आहेत. वनस्पती मधील हे सर्व वनस्पतीअर्क, त्यांचे एकात्मक पद्धतीने गुणात्मक विश्लेषण करण्याचे एकच यंत्र विकसित करून हे संशोधन युरोपीय राष्ट्रांकडे मान्यतेसाठी पाठवले होते व नुकतेच त्यास युरोपीय राष्ट्रांनी मान्यता दिली आहे. प्रोफेसर डॉ. नवनाथ काशीद यांना या अगोदरही वनस्पती मधील अनुवंशिक बदल व त्याचे परिणाम शोधण्यासाठीची जीवरासायनिक विश्लेषण यंत्र या संशोधनास युरोपीय राष्ट्रांनी पेटंट जाहीर केले होते. डॉ. काशीद यांच्या या संशोधनपर उपक्रमाबद्दल श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस चे सचिव श्री रमेशरावजी आडसकर,संचालिका श्रीमती अर्चनाताई आडसकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव फावडे सर , महाविद्यालयातील सर्व कर्मचारी , प्राध्यापक यांनी विशेष कौतुक व अभिनंदन केले आहे.

# लातूर पोलिसांना सर्वसाधारण विजेतेपद, २९ वी नांदेड परिक्षेत्रीय पोलिस क्रीडा स्पर्धेचा शानदार समारोप.

लातूर :– लातूर पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर सुरू असलेल्या नांदेड परिक्षेत्रीय पोलिस क्रीडा स्पर्धेत पुरुष गटाचे सर्वसाधारण विजेतेपद (पुरुष) लातूर ला तर महिलांचे सर्वसाधारण विजेतेपद नांदेड संघाने पटकाविले. गेल्या चार दिवसांपासून लातूर पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर सुरू असलेल्या २९ वि नादेड परिक्षेत्रीय पोलिस क्रीडा स्पर्धेचा ७ जानेवारी (मंगळवारी) समारोप झाला. या स्पर्धेत लातूर सह नांदेड, परभणी व हिंगोली असे चार पोलिस संघ दाखल झाले होते.

या स्पर्धेच्या विजेतेपदासाठी लातूर व नांदेड पोलिस संघांत अटीतटीची लढत सुरू होती.

मंगळवारी स्पर्धेच्या अंतिम दिवशी विजेत्या संघास पारितोषिक वितरण नांदेड परिक्षेत्र चे उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांच्या हस्ते झाले, तर पोलिस अधीक्षक लातूर सोमय मुंडे, पोलीस अधीक्षक हिंगोली श्रीकृष्ण कोकाटे पोलीस अधीक्षक नांदेड श्री अबीनाश कुमार पोलीस अधीक्षक परभणी श्री रवींद्र सिंह परदेशी पोलीस अधीक्षक




तथा प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र लातूर चे विजय मगर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी समारोपमध्ये नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी सांगितले की, पोलीस दलात काम करताना बौध्दीक तत्परतेसह शारीरीक कसरत, तंदुरूस्ती असणे गरजेचे आहे. त्यामुळेच पोलीस दलातील पोलीस अधिकारी अंमलदार यांनी गुन्हे तपास, कायदा व सुव्यस्था राखण्यासोबतच खेळाच्या व शारीरीक कसरतीच्या माध्यमातून सदृढ शारीरीक व मानसिक तंदुरूस्ती जपणे गरजेचे आहे. आणि त्या करीता प्रत्येकांनीच जमेल तसे वेगवेगळ्या खेळांमध्ये व स्पर्धा मध्ये भाग घेणे गरजेचे आहे. पोलीस दलाच्या व्यस्ततेतून वेळ काढून स्पर्धेत भाग घेणा–या खेळाडूंनी सरावात भाग घेवून स्वतःला तंदुरूस्त ठेवले आहे. या व्यस्ततेतून कर्तव्याबरोबरच खेळाला प्राधान्य दिल्याबद्दल स्पर्धेत भाग घेणा–या सर्व पूरूष व महिला खेळांडूचे कौतुक व अभिनंदन केले. या स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या पोलीस खेळाडूंना महाराष्ट्र राज्य पोलीस क्रिडा स्पर्धा, ठाणे येथे होणा–या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. समारोपिय कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस अधीक्षक श्री सोमय मुंडे यांनी तर आभार अपर पोलिस अधीक्षक अजय देवरे यांनी व्यक्त केले.

या परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धेचे उत्कृष्ठ आयोजन व नियोजन करून स्पर्धा यशस्वी केल्या बद्दल यजमान लातूर जिल्हा पोलीस दलातील पोलीस अधिक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधिक्षक, अजय देवरे, पोलीस उप अधिक्षक (मुख्यालय) गजानन भातलवंडे, व ईतर सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे विशेष आभार व अभिनंदन मानले.

# बंदी असतांनाही वाळूचा उपसा सुरूच, कारवाई करण्यास महसूल विभागाचे दुर्लक्ष

किनवट/शेख शौकत :–किनवट तालुक्यातील पैनगंगा नदीला लागून अनेक खेड पाड्यातून येणारे नद्या नाले पैनगंगाला येऊन जोडत आहे. नदी नाल्यात वर मोठ्या रेती तस्करी होत असताना सामान्य नागरिकांमध्ये नाराजगी दिसत आहे. किनवट तालुक्यातील मोठ्या रेती घाट एक पण नाही शासकीय रेती डेपो नसतानाही वाळू उपलब्ध होते कशी? या अनिर्बंध रेतीवर प्रतिबंध लावण्यासाठी महसूल प्रशासन का कमी पडत आहेत. या प्रश्नाचे उत्तर मात्र त्यांच्याकडे नसल्यानेच रात्रीस खेळ चाले, या रेती चोरट्यांचा असे म्हणणे वावगे होणार नाही. याला कारण म्हणजे रेती चोरट्यांचे महसूल कर्मचाऱ्यांशी मधुर संबंध असल्याचे बोलले जाते. किनवट तालुक्यात एकही रेती घाटाचा लिलाव



झाला नाही, पण चोरटी रेती पाहिजे तेव्हा उपलब्ध होत असते. मग महसूल प्रशासन डोळे उघडे ठेवून आंधळ्याचे सोंग घेते आहे. शुक्रवारी सायंकाळपासून सोमवारी सकाळपर्यंत या रेती तस्करावर कुणाचेही लक्ष व नियंत्रण नसल्यान मोठ्या प्रमाणात रेतीचा उपसा आणि चोरटी वाहतूक बिनदिक्कतपणे होत असते, सध्या रेतीचे दर गगणाला भिडले आहेत. परिणामी रेती चोरट्याने शक्कल लढविली रेकी करणारे मुख्य रस्त्यावर ठेवून उपसा करायला सुरुवात केली. नदीत वाळू भरत असल्याची तात्काळ खबर मिळते आणि तिथून वाहनाचा पोबारा होतो, हा सर्व प्रकार प्रशासनाला माहित असताना देखील रेती चोरट्याविरुद्ध मोहिम राबवायला कोणीही धजावत नाही त्याचे नवलच वाटते. यामुळे रेती तस्कर आणि महसूल प्रशासनाचे मैत्रीपूर्ण संबंधच कारणीभूत असल्याचा संशय येत आहे, विशेष म्हणजे मारेगाव, लक्कडकोट, भूलजा, प्रधान सांगवी, खंबाळा, उनकेश्वर, चिखली,व अनेक नाल्या नदी वर मोठ्यांना चोरट्या रेतीचा बेसुमार उपसा दिवस– रात्रच सुरू आहे. कांही ठिकाणी मोठ्या टिप्पर आणि ट्रॅक्टर असे सहाय्याने पात्रातून रेती वाहतूक करून ती साठविली जाते आणि त्यानंतर मागेल त्याला चढ्या भावाने रेती पुरविली जाते सध्या मोठ्या प्रमाणात शासकीय सीसी रास्ते इमारत व पुलाचे बांधकाम मोठ्यांना सुरू असून हजारो ब्रास रेती बिना रॉयल्टी मिळत असल्याने शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असल्या मुळे याला जबाबदार कोण असा सामान्य नागरिकांमध्ये चर्चाचे विषय बनला आहे.मात्र महसूल प्रशासनावर गौण खनिजाची भीस्त असताना महसुली कारवाई करण्यात सामोरे जात नाहीत अशी जनतेमध्ये चर्चा चालू आहे.

## स्थानिक गुन्हे शाखेची अवैध धंद्यावर कारवाई. ०१ लाख ०४ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखू जप्त.



लातूर :– स्थानिक गुन्हे शाखेची अवैध धंद्यावर कारवाई. ०१ लाख ०४ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखू जप्त.

या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांनी अवैध धंद्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देशित केले आहे. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदारांचे पथक तयार करून लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्याची माहिती काढून त्यावर कारवाई करण्याची मोहीम राबवित आहेत.

अवैध धंद्याची माहिती काढत असताना दिनांक ०७/०१/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकास खात्रीशीर माहिती मिळाली की, बसवेश्वर चौक ते कवा गावाकडे जाणाऱ्या रोडच्या डाव्या बाजूस असलेल्या संभाजीनगर परिसरात रोडवर एक इसम महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले अन्नपदार्थ तंबाखूजन्य पदार्थाची अवैध विक्री व्यवसाय करीत आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर माहितीची शहानिशा करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दिनांक ०७/०१/२०२५ रोजी नमूद संभाजीनगर परिसरातून ताब्यात घेऊन पाहणी केली असता त्याचे कडे महाराष्ट्र शासनाने बंदी महाराष्ट्र राज्यामध्ये विक्रीसाठी प्रतिबंधित असलेला वेगवेगळ्या कंपनीचा ०१ लाख ०४ हजार ४५० रुपयाचा गुटखा व सुगंधित पानमसाला असा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित पानमसाला, तंबाखूचा मुद्देमाल मिळून आल्याने ते मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे.

प्रतिबंधित गुटका व सुगंधित तंबाखूची अवैधरित्या विक्री व्यवसाय करीत असताना मिळून आलेला इसम नामे

१) अण्णाराव भीमराव बिरादार, वय ४४ वर्ष राहणार संभाजीनगर, कवा रोड, लातूर.

याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे विवेकानंद चौक चे पोलीस करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात,स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात पोलीस अमलदार रियाज सौदागर, मनोज खोसे, साहेबराव हाके, नितीन कठारे, राहुल कांबळे यांनी पार पाडली.

## श्री अर्जुन चव्हाण यांना यांची राष्ट्रसंत डॉ. रामराव महाराज राष्ट्रीय गोर बंजारारत्न पुरस्कार २०२५ जाहीर



केज/प्रतिनिधी सविस्तर वार्ता अशी की , श्री अर्जुन जनार्दन चव्हाण कृषी पर्यवेक्षक,शासकीय फळ रोपवाटिका राजुरी नवगण तालुका जिल्हा बीड या ठिकाणी कृषी पर्यवेक्षक या पदावर कार्यरत आहे. कृषी, सामाजिक,सांस्कृतिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांना धर्मगुरू तपस्वी संत डॉक्टर रामराव महाराज बंजारा समाज विकास फेडरेशन, भारत या राष्ट्रीय संस्थेमार्फत कृषी, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील कार्याबद्दल प्रत्यक्ष बीडमध्ये येऊन टीमने माहिती घेऊन प्रस्ताव सादर करून घेतला व त्यांना राष्ट्रसंत डॉ. रामराव महाराज राष्ट्रीय गोर बंजारा रत्न पुरस्कार– २०२५ हा पुरस्कार जाहीर झाला आहे. हा कार्यक्रम जगातील बंजारा समाजाची काशी पोहरादेवी ता. मानोरा जि. वाशिम या ठिकाणी होणार आहे. या कार्यक्रमात बंजारा समाजाचे धर्मगुरू मा. बाबुसिंग महाराज (आमदार विधानसभा तीर्थक्षेत्र पोहरादेवी ) यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे तसेच या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती... महंत कबीरदास (तीर्थक्षेत्र पोहरादेवी) महंत जितेंद्र महाराज (धर्मपीठ भक्तीधाम तीर्थक्षेत्र पोहरादेवी) महंत यशवंत महाराज (तीर्थक्षेत्र उंमरीगड ) महंत शेखर महाराज (तीर्थक्षेत्र पोहरादेवी) तसेच बंजारा समाजातील देशभरातील राजकीय क्षेत्रातील दिग्ज माननीय संजय भाऊ राठोड मंत्री जल व मर्दसंधारण महाराष्ट्र राज्य,श्री इंद्राणील नाईक राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य, माननीय बलराम नाईक खासदार वरंगल, तेलंगणा. माननीय किसन भाऊ राठोड राष्ट्रीय बंजारा परिषद महाराष्ट्र राज्य, माननीय श्री प्रभुजी चव्हाण आमदार औरद,कर्नाटक राज्य. यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय राष्ट्रसंत डॉ. रामराव महाराज राष्ट्रीय रत्न गोर बंजारा रत्न पुरस्कार २०२५ पुरस्कार प्राप्त बांधवांचा सभागृह भक्तीधाम उमरीगड रोड तीर्थक्षेत्र पोहरादेवी तालुका मानोरा जिल्हा वाशिम या ठिकाणी दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी वार :– शनिवार वेळ १२–०० वाजता पुरस्कार वितरण होणार आहे.नुकताच श्री अर्जुन चव्हाण महाराष्ट्र शासन कृषी विभागाकडून कृषी विभागातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल विभागातील सर्वोच्च पुरस्कार पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवा रत्न पुरस्कार २०२२ मा. राज्यपाल सी.पी राधाकृष्णन. यांच्या हस्ते मिळाला आहे. तसेच कृषी विभागाकडून जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत उत्कृष्ट कर्मचारी म्हणून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जलमित्र पुरस्कार हा पुरस्कार मिळाला आहे मिळालेला आहे.. श्री अर्जुन चव्हाण साहेब हे वसंतराव नाईक अधिकारी कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य, ट्रेड युनियन बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष आहेत. त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक,शैक्षणिक,कृषी क्षेत्रातील केलेले कार्याची दखल घेऊन. धर्मगुरू तपस्वी संत डॉ. रामराव महाराज समाज विकास फेडरेशन भारत, या राष्ट्रीय संस्थेने राष्ट्रसंत डॉ. रामराव महाराज राष्ट्रीय राष्ट्रीय गोर बंजारा रत्न पुरस्कार २०२५ साठी निवड केली आहे. याबद्दल त्यांचा सर्व समाज बांधवांच्या वतीनेस्तरातून अभिनंदन होत आहे.

## लातुरात तीन दिवसीय मराठवाडा शैक्षणिक महासंमेलन व प्रदर्शन–२०२५ चे आयोजन

लातूर : मराठवाड्यात प्रथमच लातूर येथे दि. १०, ११ व १२ जानेवारी २०२५ या दरम्यान तीन दिवसीय मराठवाडा शैक्षणिक महासंमेलन व प्रदर्शन–२०२५ चे आयोजन करण्यात आल्याची माहिती महासंमेलन संयोजन समितीचे अध्यक्ष ओमप्रकाश झुरळे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली. सदर मराठवाडा शैक्षणिक महासंमेलन व प्रदर्शन माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धीरज देशमुख व लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सहकार्याने करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.



लातूरच्या टाऊन हॉल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कवर आयोजित करण्यात आलेल्या या तीन दिवसीय शैक्षणिक महासंमेलनाच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात सध्यस्थितीत होणाऱ्या विविध बदलांची माहिती तसेच परिपूर्ण ज्ञान उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मराठवाडा ही संतांची भूमी म्हणूनही ओळखली जाते. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांना स्वतः ची एक वेगळी ओळख आहे. या भागाला समृध्दशाली ऐतिहासिक पार्श्वभूमी असून सुंदर अशा भूगोलाची किनार लाभली आहे. त्यातील लातूर हे तर शैक्षणिक तीर्थच आहे . लातूरच्या शैक्षणिक परंपरेला अनेक शिलालेख व ताम्रपटांतून दुजोरा मिळतो. गेल्या तीन दशकांत 'लातूर पॅटर्न' हा महामंत्र देशभरात दुमदुमतो आहे. लातूरच्या विद्यार्थ्यांनी जगातील अनेक विकसित देशांमध्ये आपली विशेष ओळख निर्माण केली आहे. देशाला आणि जगाला वर्षाकाठी शेकडो डॉक्टर्स व इंजिनिअर्स देणा–या लातूरकडून समाजाच्या विविधांगी अपेक्षा वाढल्या आहेत.

आता नव्या पिढीला गरज आहे ती विज्ञान, तंत्रज्ञान, सशोधन, गणित, भाषा, कला, क्रिडा, सैनिक शिक्षण तसेच कौशल्याधिष्टीत अभ्यासक्रमांची. रोजगारांच्या नवीन संधीची व तसेच विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, प्राध्यापक, प्राचार्य, संस्थाचालक यांच्या मार्गदर्शनाची... नेमकी हीच गरज ओळखून मराठवाडा एज्युकेशन कॉन्क्लेव्ह–२०२५ (मराठवाडा शैक्षणिक महासंमेलन व प्रदर्शन २०२५) चे लातूर नगरीत पहिल्यांदाच आयोजन करण्यात आले आहे.

या शैक्षणिक महासंमेलनात विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व आय. ए. एस. अधिकारी यांच्या प्रेरणादायी व भविष्यवेधी मुलाखती,शैक्षणिक क्षेत्रातील भेडसावणाऱ्या प्रश्नांवर व नोकरीच्या संधी या विषयांवर देशभरातील तज्ज्ञांची व्याख्याने, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, संस्था यांच्यासाठी दिशादर्शक, नाविन्यपूर्ण विविध साहित्य कृतींचे, बदलत्या अत्याधुनिक अद्यावत तंत्रज्ञानाचे, शैक्षणिक साधनांचे १०० पेक्षाही अधिक स्टॉल्स यावेळी लावण्यात येणार आहेत. या महासंमेलनात सहभागी झालेल्या शाळा व महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच महासंमेलनातील शैक्षणिक सत्रास नोंदणी करुन उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थी व शिक्षक यांना ऑनलाईन सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. या महासंमेलनाचा मराठवाड्यातील शिक्षणप्रेमींनी लाभ घ्यावा, असे आवाहनही महासंमेलनाचे अध्यक्ष ओमप्रकाश झुरळे,उपाध्यक्ष विजय सहदेव, सचिव प्रमोद भोयरेकर, कोषाध्यक्ष अमोल चव्हाण, संचालक विवेक सौताडेकर यांनी केले आहे.

# पैशाची बॅग लुटणाऱ्या आरोपी ताब्यात. ०७ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत. स्थानिक गुन्हे शाखेची उत्कृष्ट कामगिरी.

लातूर :– पैशाची बॅग लुटणाऱ्या आरोपी ताब्यात. ०७ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत. स्थानिक गुन्हे शाखेची उत्कृष्ट कामगिरी.

मोटर सायकल वरून बँकेमध्ये भरण्यासाठी पैसे घेऊन जात असताना पैशाची बॅग हिसकावणाऱ्या आरोपीला अटक. रोख रक्कम व मोटरसायकलसह ०७ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त.

याबाबत थोडक्यात माहिती अशी की, काही दिवसा पुर्वी बाभळगाव ते बसवेश्वर चौक जाणारे रिंग रोड वर मोटार सायकल वरून घेऊन जात असलेली ७ लाख २१ हजार रुपयांची बॅग लुटण्याची घटना घडली होती. त्यावरून पोलीस ठाणे विवेकानंद चौक येथे अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याकरिता आदेशित केले होते. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक



संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात पोलीस अधिकारी/अमलदारांचे पथक तयार करण्यात आले होते. सदर पथकामार्फत विविध गुन्हेगारांची माहिती एकत्र करून त्याचे विश्लेषण करण्यात येत होते.

सदर आरोपीचा शोध घेण्यासाठी पथक रात्र–दिवस परिश्रम घेत होते. तसेच गोपनीय बातमीदार नेमून त्यांच्याकडून माहिती घेण्यात येत होती.

दरम्यान ०७/०१/२०२५ पोलीस पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, पैशाची बॅग लुटणाऱ्या गुन्ह्यातील एक आरोपी रिंग रोड वरील मळवटी चौक परिसरात थांबलेला आहे अशी माहिती मिळाली. सदर माहितीची शहनिशा करून वरिष्ठांच्या मार्गदर्शनात नमूद गुन्हयातील संशयित आरोपीला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव अनिकेत विठ्ठल सगरे, वय २४ वर्ष, राहणार मळवटी रोड, नाथ नगर,लातूर, असे असल्याचे सांगून तो व त्याचे सोबतचे आणखीन पाच मित्र अशा सर्वांनी मिळून काही दिवसांपूर्वी बाभळगाव ते बसवेश्वर चौकाकडे जाणाऱ्या रिंग रोड वरून एका मोटरसायकल स्वारास अडवून त्याच्याकडील पैशाची बॅग जबरदस्तीने हिसकावून घेऊन चोरी केल्याचे सांगितले. त्यांची नावे विष्णू मांगीलाल प्रजापती, राहणार इकबाल चौक, मळवटी रोड, लातूर, पवन लक्ष्मण बोयने, राहणार अराफत चौक, मळवटी रोड, लातूर, शुभम शिंदे, राहणार इकबाल चौक, लातूर, अमन आदम सूर्यवंशी, राहणार आझाद शाळेच्या पाठीमागे, मळवटी रोड, लातूर, अमरदीप रवी काळे, राहणार म्हाडा कॉलनी, बाबळगाव रोड, लातूर, असे असून वर नमूद आरोपींनी मिळून लातूर पैशाची बॅग जबरदस्तीने चोरल्याचे सांगितले. नमूद आरोपी कडून गुन्ह्यातील चोरलेल्या रकमेपैकी ५ लाख ६० हजार रुपये रोख व गुन्ह्यात वापरलेले दोन मोटरसायकल हस्तगत करण्यात आले आहेत.

अनुक्रमांक २ ते ६ आरोपी फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. एक आरोपी व मुद्देमाल पुढील कार्यवाही करिता पोलीस ठाणे विवेकानंद चौक यांच्या ताब्यात देण्यात आले.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अमलदार सूर्यकांत कलमे, रियाज सौदागर, सुधीर कोळसुरे, राजेश कंचे, योगेश गायकवाड ,विनोद चलवाड, तुळशीराम बरुरे, गोविंद भोसले, जमीर शेख चालक पोलिस अमलदार प्रदीप चोपणे व पोलिस ठाणे विवेकानंद चे पोलिस अमलदार आनंद हल्लाळे, रणवीर देशमुख यांनी केली आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE